**बातमीपत्र**

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

**माहिती कक्ष, दि. १२ एप्रिल २०२३**

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २१९/२०२३ भादंविसक ३२४,५०४,५०६ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १०/०४/२०२३ रोजी २०.०० वा. फिर्यादीचे राहते घराजवळ सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ११/०४/२०२३ रोजी २३.०७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | उषा अजित पवार,वय-३० वर्षे,रा- दमाणी नगर ब्लॉक नं ७,पावन गणपती मंदिराच पाठीमागे सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | गणेश राजू मोरे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील आरोपी मजकूर याने फिर्यादीचे सासऱ्याचे अंगावर मुद्दाम काठी फेकून वाद केला होता फिर्यादी त्याचे भांडण सोडविण्यासाठी गेली असता आरोपी मजकूर याने फिर्यादीस शिवीगाळ करत फिर्यादीच्या डोक्यात त्याच्या हातात असलेले लाकडी टेबल उचलून डोक्यात मारून जीवे मारण्याची धमकी दिली आहे तसेच मारहाण केल्याने फिर्यादीचे डोक्यात जखम होवून रक्तस्त्राव सुरू झाले आहे.म्हणून. तपास:- मपोना/१७५/चौधरी- |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २२३/२०२३ भादंविसक ३२४,३२३,५०४,५०६ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १०/०४/२०२३ रोजी १९.३० वा. तोगटवीर बालक मंदिर समोर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ११/०४/२०२३ रोजी १५.१२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | संजय उत्तम काळे,वय-३६ वर्षे,रा- ७३८,राघवेंद्र मंदिर जवळ क्षीरालिंग नगर जुनाविडी घरकुल सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | संदिप प्रल्हाद चव्हाण,रा- नवीन विडी घरकुल कुंभारी द.सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी बंद गाळयासमोर थांबले असता तेथे फिर्यादीचा सख्खा लहान मेव्हणा यातील आरोपी मजकूर हा येवून फिर्यादीस म्हणाला की तु सारखा माझी मोठी बहिण हिच्यासोबत का वाद करीत असतो असे म्हणून फिर्यादी शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी मारहाण करीत असताना फिर्यादी त्यास आडवत असताना आरोपीने त्याचे कमरेला असलेला लहान चाकु फिर्यादीचे डाव्या डोळयाच्या भुवईवर लागला होता म्हणून फिर्यादी घाबरून जवळच असलेल्या राहते घरी गेले असता परत आरोपीने फिर्यादीचे घरासमोर येवून तुला सोडत नाही तुला बघुन घेतो अशी धमकी देवून निघून गेला आहे.म्हणून. तपास:- पोना/१३८८/कांबळे- ८६००२२१२६४ |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १९२/२०२३ भादंविसक ३२४,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०७/०४/२०२३ रोजी १७.३० वा श्राविका प्रशाला सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ११/०४/२०२३ रोजी २३.११ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | गौरव किरण पात्रे,वय-२६ वर्षे,रा- विरफकीरा चौक घनं ४१/३३,न्यु बुधवार पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) सागर मल्लीनाथ देवकुळे, २) मल्लीनाथ दगडू देवकुळे, ३) रोहन बापू देवकुळे, ४) बापू दगडू देवकुळे, रा- विरफकीरा चौक घनं ४१/३३,न्यु बुधवार पेठ सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे श्राविका प्रशाला येथून जात असताना यातील आरोपी क्र १ याने फिर्यादीची गाडी थांबवून आरोपीचे बहिणीशी फिर्यादीचे असलेले प्रेम संबंधामुळे आरोपी ने फिर्यादीस तलवारीने डाव्या हाताचे पोटरीवर व डाव्या हाताचे करगंळीस मारून गंभीर जखमी केले आहे तसेच आरोपी क्र २ ते ४ यांनी फिर्यादीस शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी मारहाण केली आहे.म्हणून. तपास:- पोसई ताकभाते- **९२८४६४९१७८** |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १९९/२०२३ भादंविसक ३८१ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १०/०४/२०२३ रोजी ०८.३८ वा. रेनॉल्ट कार शोरूम आसरा चौक होटगी रोड सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ११/०४/२०२३ रोजी २०.१७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | नरेंद्र बालय्या गादास,वय-४८ वर्षे,व्यवसाय-अकाऊंट मॅनेजर रा- पाटील नगर आकाशवाणी केंद्रजवळ एमआयडीसी सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | व्यंकटेश मुरली संदुपटला,वय-२३ वर्षे,रा- साईबाब चौक नवदुर्गा वाईनच्या पाठीमागे सोलापूर |
| **गेला माल** | | ४,००,०००/- रू भारतीय चलनी नोटा रोख रक्कम |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील आरोपीत मजकूर हा वरील ठिकाणी कॅशिअर काम करीत असे आरोपीत मजकूर यांनी शोरूमचे अकाऊंट रूमधील लोखंडी कपाटातील लॉकर मध्ये ठेवलेली शोरूमची वरील रोख रक्कम यातील आरोपीत मजकूर यांनी त्यांच्या जवळील चावीने लॉकर उघडून फिर्यादीचे संमतीवाचून मुद्दाम लबाडीने चोरून नेली आहे.म्हणून. तपासः- पोसई मुरकुटे- **८६६८८१९२८५** |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २०२/२०२३ भादंविसक ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ११/०४/२०२३ रोजी ०५.४५ वा. शासकीय मैदान नेहरूनगर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ११/०४/२०२३ रोजी २३.४१ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सुनिल अंकुश गाडे,वय-२९ वर्षे,रा-आरटीओ ऑफिस रोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | ७,०००/- रू ची केशरी व काळया रंगाची फॅन्टम कंपनीची सायकल. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची ताब्यातील वरील कंपनीची सायकल ही फिर्यादी व्यायमकरण्याकरीत मैदानावरती गेले असता नमुद सायकल ही गेटच्या आतील पार्किग मध्ये पार्क केली असता कोणीतरी अज्ञात चारेटयाने फिर्यादीचे नमुद वर्णनाची व किंमतीची सायकल ही मुद्दाम लबाडीने चोरून नेले आहे. म्हणून. तपासः- पोना/१०१३/विधाते- |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २०१/२०२३ भादंविसक ५०४,५०६,महा सावकारी का ३९,४५ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | सन २०१८ मध्ये घरनं २५९/२६० कल्याण नगर भाग-१ जुळे सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ११/०४/२०२३ रोजी २२.५२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | विमल दिपक गोरे,वय-५३ वर्षे,रा- घरनं २५९/२६० कल्याण नगर भाग-१ जुळे सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) अक्षय ससाणे, २) अनिल माशाळ ३) अमोल कांबळे ४) उमेश जाधवची बहिण,५) नवीन वॉल्टर,सर्व रा- कल्याण नगर भाग-१ जुळे सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचा मुलगा प्रशांत यांने आरोपीत मजकूर यांच्याकडून घेतलेल्या व्याजाचे पैशाच्या कारणावरून वरील आरोपीत मजकूर हे सतत त्रास देत होते,म्हणून फिर्यादीचा मुलगा हा सन २०१८ मध्ये वरील आरोपीत हे बेकायदेशीर रित्या व्याजभट्टा करीत असत त्यास कंटाळून घर सोडून जाताना घरात एक चिट्टी लिहून निघून गेला आहे. सदरची चिट्टी ही फिर्यादीस ऊशिरा मिळाल्याने आज रोजी वरील नमुद आरोपीत यांच्यावर कायदेशीर फिर्यादी दाखल आहे.म्हणून. तपासः- पोना/१०१३/विधाते- |